# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.03.2025** **वार-रविवार**

---

**<u>कालवा समिती</u>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी 15 जुलैपर्यंत पाण्याचं काटेकोरपणे नियोजन करावं अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी काल दिल्या. कालवा सल्लागार समितीची बैठक काल पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली; त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रकल्प आराखड्यानुसार मंजूर पाण्याचं वितरण सर्व प्रकल्पांना करावं, अशा सूचना विखे-पाटील यांनी यावेळी दिल्या. उपसा सिंचन पाणीपट्टी वाढीला स्थगिती देण्यात आली असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>बेवारसवाहने</u>**

पुण्यातील रस्त्यांवर धूळ खात पडलेली बेवारस वाहनं हटवण्यासाठी पुणे पोलीस आणि महापालिका प्रशासनाने व्यापक मोहीम हाती घेतली आहे. याची सुरुवात कसबा मतदारसंघातून करण्यात आली. येत्या १५ दिवसांत या भागातली सर्व बेवारस वाहनं हटवली जाणार असल्याची माहिती अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली आहे. आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना अंतर्गत गणेश पेठेतील दूधभट्टी चौकामध्ये या

मोहिमेचा प्रारंभ आज  करण्यात आला. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी, पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल, यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**<u>ऊसगाळप</u>**

पुणे जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम आता संपत आला आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील कारखान्यांनी ९० लाख टन ऊस गाळप केला असून ८२ लाख २६ हजार क्विंटल साखर निर्मिती केल्याची माहिती पुणे साखर आयुक्तालयानं दिली आहे. यंदा साखरेचा उतारा गेल्या हंगामाच्या तुलनेत एक टक्क्यानं घटण्याची शक्यता आहे. गेल्या हंगामात जिल्ह्यात १३३ लाख टन गाळप होऊन १३९ लाख क्विंटल साखर निर्मिती झाली होती.

**<u>उज्ज्वलनिकम</u>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व समाजाला एकत्र करण्याची शिकवण दिली, तीच  आपण अंमलात आणू या, असं आवाहन ज्येष्ठ विधीज्ञ ॲडवोकेट उज्ज्वल निकम यांनी पुण्यात केलं. मराठा आंत्रप्रिन्युअर्स असोसिएशननं भरवलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र निंबाळकर, असोसिएशनचे अध्यक्ष अरुण निम्हण आदी यावेळी उपस्थित होते.

**<u>जीबीएस</u>**

राज्यातल्या जीबीएसच्या रुग्णांची संख्या २२२ झाली असून आतापर्यंत ११ जणांचा बळी गेला आहे. मृतांमधील चार रुग्णांना जीबीएसची लागण झाली होती, तर ७ संशयित रुग्ण होते. या आजाराचे सर्वाधिक रुग्ण पुणे जिल्ह्यातील आहेत. राज्यात जीबीएसच्या ३१ रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत, तर १६जण जीवरक्षक प्रणालीवर आहेत.

**<u>रागप्रभा</u>**

राग प्रहरांच्या कालबाह्य संकल्पनांपासून मुक्त असलेला रागप्रभा संगीतोत्सव आज पुण्यात सादर होत आहे. डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशननं आयोजित केलेल्या या महोत्सवात सकाळच्या पहिल्या सत्रात पंडित हरिप्रसाद चौरसिया, पंडित उदय भवाळकर, विदुषी पद्मा तळवलकर, पंडित राजा काळे, पंडित राम देशपांडे यांचं  सादरीकरण झालं. राग यमन, पूरिया, दरबारी, असे सायंकालीन राग सकाळच्या सत्रात ऐकायला मिळाले. राग-रागिणी सादरीकरणावर काळाचं बंधन नको, या प्रभा अत्रे यांच्या संकल्पनेशी आपण सहमत आहोत असं पंडित हरिप्रसाद चौरसिया यावेळी म्हणाले.

**<u>रोबोटिक्स</u>**

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर नुकत्याच रोबोटिक्स अजिंक्यपद स्पर्धा पार पडल्या. देशातील विविध ६० शहरांसह कझाकस्तान, श्रीलंका, युएईमधील ६ आंतरराष्ट्रीय संघ यात सहभागी झाले होते. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून रोबोटिक्स विश्वाचा अनुभव घेतला.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने फ्लॉवर, कोबी, लसूण आणि शेवगा यांच्या भावात घट झाली तर आवक घटल्याने हिरवी मिरची महागली.  बहुतांश पालेभाज्याचे भाव वाढले आहेत.

फळ बाजारात रसाळ फळांना मागणी वाढली असून भाव वधारले आहेत. लग्नसराईमुळे फुल बाजारात रेलचेल असून शोभिवंत फुलांचे भाव टिकून आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 36 तर किमान 17 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**